# प्रेसनोट

दि.२६/०८/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | दत्तु आश्रुबा सांगळे, पद–प्रादेशिक व्यवस्थापक, वर्ग–१, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर अतिरिक्त कार्यभार जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५,५००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,५००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचा इलेक्ट्रॉनिकचा व्यवसाय असुन, त्यांना सदर व्यवसायासाठी कर्जाची आवश्यकता असल्याने त्यांनी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजनेचा ऑनलाईन फार्म भरला होता. सदर कर्ज व्याज परतावा योजनेचे ऑनलाईन प्रकरण प्रादेशिक कार्यालय येथे पाठविणे करीता आरोपी लोकसेवक यांनी लाच मागणी केल्याबाबतची तक्रार दिनांक २४/८/२०२४ रोजी ला.प्र.वि. कार्यालय अहमदनगर येथे प्राप्त झाली होती. सदर लाच मागणीच्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. २४/०८/२०२४ रोजी मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक सांगळे यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष ५,५००/– रुपये लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.<br>दिनांक २६/८/२०२४ रोजी आयोजीत सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक सांगळे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन ५,५००/– रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक सांगळे यांचेविरुध्द तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर